Marketing and Publicity Department
Head Office, Lokmangal
1501, Shivaji Nagar, Pune 411 005
020- 25614324
media@mahabank.co.in

## वृत्तपत्रीय निवेदन

**दिनांक** : 29th **एप्रिल** 2021

## 31st मार्च 2021 रोजी संपलेली तिमाही व वार्षिक आर्थिक निकाल

**बँक ऑफ महाराष्ट्रला रु.550 कोटी, निव्वळ नफा 42%.**वाढ.

कामगिरीतीत सातत्य , नफा क्षमतेत वाढ , संतुलित वाढ

**दृष्टीक्षेपात निकाल**

वित्तीय वर्ष २०- २१ चौथी तिमाही

- **निव्वळ नफ्यात** 187% **वाढ होऊन नफा रु** 165 **कोटी**
- **कार्यान्वयन नफा 159 % वाढून रु** 1540 **कोटी. ( तांत्रिकदृष्ट्या लेखाबंद खात्यात रु** 509 **कोटीचे असाधारण उत्पन्न वगळता कार्यान्वयन नफा** 73% **वाढून रु 1031 कोटी झाला आहे. )**
- **निव्वळ व्याज उत्पन्न 35 % वाढून रु** 1,383 **कोटी**
- **निव्वळ व्याज अंतर** 2.43 % वरून 3.11%
- शुल्क आधारित उत्पन्न **22 %** वाढून रु **315** कोटी **उत्पन्नात 86 %** वाढ होऊन रु **727** कोटी (**तांत्रिकदृष्ट्या लेखाबंध खात्यात रु** 509 **कोटीचे असाधारण उत्पन्न वगळता )**

वित्तीय वर्ष २०२० – २१

- **निव्वळ नफ्यात** 42% **वाढ होऊन रु** 550 **कोटी**
- **कार्यान्वयन नफा** 39 % **वाढून रु** 3,958 **कोटी**. (**तांत्रिकदृष्ट्या लेखाबंध खात्यात रु** 509 **कोटीचे असाधारण उत्पन्न वगळता कार्यान्वयन नफ्यात** 21 % वाढ. )
- **निव्वळ व्याज उत्पन्न** 14 % **वाढून रु**. 4,898 **कोटी**
- **कासा ( चालू व बचत खात्यातील ठेवी )** 54 %
- संरक्षक तरतूद गुणोत्तरामध्ये **(** Provision Coverage Ratio **)** (PCR) **सुधारणा होऊन तो** 90 % **झाला आहे**
- एकूण थकित कर्जे 12.81 % **वरून घटून** 7.23 %. निव्वळ थकित कर्जे 4.77% **वरून घटून** 2.48% .
- **शुल्क आधारित उत्पन्न** 17.65% **वाढून रु** 1,002 **कोटी** अन्य उत्पन्नात 59.18 % **वाढ होऊन रु** 2,625 **कोटी** .
- **खर्च उत्पन्न गुणोत्तरात सुधारणा होऊन त्यात** 51.97% **वरून** 47.39 % **पर्यंत घट** (**रु** 509 **कोटीचे**

बँक ऑफ महाराष्ट्र
Bank of Maharashtra
भारत सरकार का उद्यम
एक परिवार एक बँक

Marketing and Publicity Department
Head Office, Lokmangal
1501, Shivaji Nagar, Pune 411 005
020- 25614324
media@mahabank.co.in

**असाधारण उत्पन्न वगळता खर्च उत्पन्न गुणोत्तर** 50.82 %).

व्यवसाय वृद्धी

- बँकेचा एकूण व्यवसाय 15 % वाढून रु 2,81,659 कोटी . क्रमिक आधारावर ती 6% पर्यंत आहे
- **एकूण ठेवी** 16 % **वाढून रु** 1,74,006 कोटी . क्रमिक आधारावर ती 7% पर्यंत .
- **कासा ( चालू व बचत खात्यातील ठेवी )** 24 % वाढून रु 93,945 कोटी
- **एकूण** कर्जे 13 % वाढून रु 1,07,654 कोटी . निव्वळ कर्जे 18 % वाढून रु 1,02,405 कोटी
- **रिटेल, कृषी व सूक्ष्म, लघु, मध्यम उपक्रम** ( RAM - Retail, Agri & MSME ) **व्यवसायात** 25 % **वाढ** . **रिटेल कर्जात** 26% वाढ होऊन रु 28,651 कोटी. **सूक्ष्म, लघु, व मध्यम उपक्रमांना** ( MSME ) कर्ज पुरवठ्यात 35 % वाढ होऊन रुपये 23,133 कोटी

**भांडवल स्थिती :**

- बेसल III नुसार भांडवल पर्यायप्तेचे प्रमाण 14.49 पैकी CET1- प्रमाण 10.97).
- 217.22 % तरलता पर्यायप्तेचे गुणोत्तर हे नियामकीय आवश्यकतेपेक्षा 100% अधिक
- दिनांक 31.03.2021 रोजी समाप्त वर्षात उभारलेले टीयर – II भांडवल रु. 505.70 कोटी

संपत्ती गुणवत्ता :

- दिनांक 31.03.2020 रोजीच्या 12.81 % **एकूण** थकीत कर्जांच्या तुलनेत दिनांक 31.03.2021 रोजी **एकूण** कर्जे 7.23 %. दिनांक 31.12.2020 हेच प्रमाण 7.69 % होते .
- दिनांक 31.03.2020 रोजीच्या 4.77% निव्वळ थकीत कर्जांच्या तुलनेत दिनांक 31.03.2021 रोजी निव्वळ कर्जे 2.48 %. दिनांक 31.12.2020 हेच प्रमाण 2.59 % होते .
- दिनांक 31.03.2020 रोजीच्या 84% संरक्षक तरतूद गुणोत्तराच्या तुलनेत दिनांक 31.03.2021 रोजी संरक्षक तरतूद गुणोत्तरात 90% पर्यत सुधारणा . 31.12.2020 हे प्रमाण 90% एवढेच होते
- गत तिमाहीत बँकेने कोव्हीड १९ अंतर्गत रु 508 कोटी तरतूद केली आहे. बँकेची कोव्हीड १९ अंतर्गत व्याजासह एकूण तरतूद 753.47 कोटी एवढी आहे .

Marketing and Publicity Department
Head Office, Lokmangal
1501, Shivaji Nagar, Pune 411 005
020- 25614324
media@mahabank.co.in

नवे उपक्रम :

बँक ऑफ महाराष्ट्र डिजिटल बँकिंग सेवांमध्ये बरोबरीच्या बँक गटात सर्वात आघाडीवर आहे. सूक्ष्म , लघु व मध्यम उद्योगांना कर्ज देण्यासाठी बँकेने बिगर बँकिंग वित्तीय कंपनीशी सह- कर्ज व्यवहार ( डिजिटल कर्ज व्यवहार) करार केला आहे. मोबाईल ऍप चा वापर करून कर्ज मंजुरी व वितरणाची सुविधा बँकेने ग्राहकाला उपलब्ध करून दिली आहे.

क्यू आर कोड वरून व्यवहार करण्यासाठी बँकेने महा- भीम क्विक पे हे मोबाईल ऍप सुरु केले आहे. व्यापारी क्यू आर कोड प्राप्त करण्यासाठी स्वतःच नोंदणी करून त्या द्वारे आपले व्यवहार करू शकतात. खाते उघडण्यासाठी ऑनलाईन सुविधा उपलब्ध करून दिली असून त्यामुळे ग्राहकांना बँकेच्या शाखांमध्ये न जाता जलद व सुलभ पद्धतीने आपले खाते उघडणे शक्य झाले आहे. बँकेने टॅब बँकिंग प्रणाली सुरु केली असून ग्राहकाला जलद व सुलभ पद्धतीने आपले खाते उघडणे शक्य झाले आहे

बँकेने कर्ज व्यवहारांच्या संपूर्ण प्रकियेचे डिजिटल स्वरूपात रूपांतरण करण्यासाठी ( Bank implemented Loan Lifecycle Management System - LLMS) प्रणाली सुरु केली आहे. परिचालन खर्च घटविण्यासाठी , पत मुल्यामापन प्रणालीत सुधारणा करण्यासाठी व ग्राहकांना अधिक आनंददायी बँकिंगचा अनुभव देण्यासाठी बँक कर्ज व्यवस्थापन प्रणाली अवलंबित आहे. बँकेने आपले क्रेडीट कार्ड सुरु केले असून पुढील ५ वर्षात पाच लाख क्रेडीट कार्डे वितरीत करण्याचे बँकेचे उद्दिष्ट आहे

मनुष्यबळ विषयक सर्व प्रक्रिया सुविहित करण्यासाठी बँकेने मनुष्यबळ व्यवस्थापन प्रणाली – HRMS कार्यान्वित केली आहे. सेवेची सुरवात करण्यापासून ते सेवानिवृत्तीपर्यंत सर्व मनुष्यबळ विषयक बाबी मनुष्यबळ व्यवस्थापन प्रणाली – HRMS मध्ये हाताळल्या जातात

**ठळक व्यवसाय वैशिष्टे:** (रू. कोटी मध्ये)

| तपशील | वित्तीय वर्ष | | वृद्धी (%) |
|---|---|---|---|
| | मार्च 20 | मार्च 21 | वर्ष ते वर्ष |
| एकूण व्यवसाय | 244,955 | 281,659 | 14.98 |
| ठेवी | 150,066 | 174,006 | 15.95 |
| त्यापैकी कासा ठेवी | *75,475* | *93,945* | 24.47 |
| एकूण ठेवींमध्ये कासाचे प्रमाण (%) | *50.29* | *53.99* | |

Marketing and Publicity Department
Head Office, Lokmangal
1501, Shivaji Nagar, Pune 411 005
020- 25614324
media@mahabank.co.in

| | | | |
|---|---|---|---|
| एकूण कर्जे | 94,889 | 107,654 | 13.45 |

**नफा क्षमता** (रू. कोटी मध्ये)

| तपशील | वित्तीय वर्ष | | वृद्धी (%) | तिमाही | | बदल (%) |
|---|---|---|---|---|---|---|
| | मार्च 20 | मार्च 21 | वर्ष ते वर्ष | मार्च 21 | मार्च 21 | वर्ष ते वर्ष |
| **एकूण उत्पन्न** | 13,145 | 14,494 | 10.26 | 3,198 | 4,333 | 35.48 |
| **एकूण खर्च** | 10,298 | 10,536 | 2.32 | 2,603 | 2,793 | 7.30 |
| **कार्यान्वयन नफा** | 2,847 | 3,958 | 39.01 | 595 | 1,540 | 158.74 |
| **कर वगळता तरतुदी व आकस्मिकता** | 3,107 | 2,727 | (12.26) | 910 | 1,063 | 16.76 |
| **करपूर्व नफा** | (260) | 1,231 | 572.74 | (315) | 477 | 251.42 |
| **कर खर्च** | (649) | 681 | 204.91 | (373) | 312 | 183.72 |
| **निव्वळ नफा** | 389 | 550 | 41.61 | 58 | 165 | 186.76 |

**ताळेबंद** (रू. कोटी मध्ये)

| देणी | वित्तीय वर्ष | |
|---|---|---|
| | मार्च 20 | मार्च 21 |
| भांडवल | 5,824 | 6,560 |
| गंगाजळी | 4,931 | 5,573 |
| ठेवी | 150,066 | 174,006 |
| कर्जे | 3,670 | 4,239 |
| अन्य देणी व तरतुदी | 4,375 | 6,287 |
| **एकूण** | **168,867** | **196,665** |
| **मालमत्ता** | | |
| रिज़र्व बँक ऑफ इंडिया कडील रोख व ठेवी | 10,354 | 12,882 |
| इतर बँकांकडील येणी , कॉल व शॉर्ट नोटिस मनी | 93 | 59 |
| गुंतवणूकी | 57,741 | 68,112 |
| कर्जे (निव्वळ) | 86,872 | 102,405 |
| स्थिर मालमत्ता | 1,676 | 1,674 |
| इतर मालमत्ता | 12,132 | 11,532 |
| **एकूण** | **168,867** | **196,665** |

**गुंतवणूकदारासाठी सादरीकरण बँकेच्या** www.bankofmaharashtra.in**या वेबसाइट वर वेगळे देण्यात येत आहे.**

Marketing and Publicity Department
Head Office, Lokmangal
1501, Shivaji Nagar, Pune 411 005
020- 25614324
media@mahabank.co.in